**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४९/२०२०** **दिनांक १९/०६/२०२०** **कालावधी ५ दिवस**

| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १३/०६/२०२० ते १९/०६/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २०/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून २४/०६/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३/०६ | १४/०६ | १५/०६ | १६/०६ | १७/०६ | १८/०६ | १९/०६ | | २०/०६ | २१/०६ | २२/०६ | २३/०६ | २४/०६ |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ४९ | २९ | ३१ | २९ | ३६ |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३३ | ३३ | ३४ | ३३ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २४ | २४ | २३ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ७ | ७ | ८ | ८ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९० | ८८ | ८७ | ८६ | ८७ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७७ | ६५ | ६५ | ६९ | ७३ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | १० | १२ | १२ | ९ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | द. | द. | द. | द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| -- | -- | **५१९७.२** |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २० ते २४ जून, २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी मध्यम पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोप अवस्था** | • मागील आठवड्यात पडलेल्या मुसळधार पाऊसामुळे भात रोपवाटिकेचे नुकसान झाले असल्यास अशा ठिकाणी रहू पध्दतीने (मोड आलेले बियाणे) भात बियाण्यांची पेरणी करून रोपवाटिका तयार करावी.<br>• बांधावरील खेकड्यांच्या नियंत्रणासाठी पावसाळ्याच्या सुरुवातीला सलग २ ते ३ रात्री बांधावरील खेकडे बत्तीच्या उजेडात पकडून त्यांची संख्या कमी करावी आणि नंतर विषारी आमिषाचा वापर करून खेकड्यांचे नियंत्रण करावे. १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत आमिष वापरावे. विषारी आमिषाचा वापर सांघिकरीत्या व एकाच वेळी केल्यास खेकड्यांचे नियंत्रण करण्यास मदत होईल. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही). |
| **नागली** | **रोप अवस्था** | • पाऊसाची तीव्रता कमी असताना नागली रोपवाटिकेला युरिया खताची दुसरी मात्रा १ किलो युरिया प्रति गुंठा क्षेत्राला पेरणीनंतर १५ दिवसांनी देण्यात यावी. |
| **आंबा** | **-** | • दहा वर्षावरील आंबा कलमास ५० ते १०० कि.ग्रॅ. चांगले कुजलेले शेणखत, ३ किलो २५० ग्रॅम युरिया, ३ किलो १२५ ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट व २ किलो सल्फेट ऑफ पोटॅश खते प्रती कलमास देण्यात यावी. खते कलमाच्या विस्ताराच्या आत सुमारे ४५ ते ६० सें.मी. रुंद आणि १५ सें.मी. खोल वर्तुळाकार चर खणून दयावीत. चरामध्ये प्रथम पालापाचोळा, शेणखत टाकून त्यावर रासायनिक खते टाकून मातीने चर बुजवून घ्यावे. |
| **नारळ** | **-** | • नारळाच्या पाच वर्षावरील प्रती माडास ३० कि.ग्रॅ. शेणखत, ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट, ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश खताची मात्रा बांगडी पध्दतीने देण्यात यावी. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २/५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट दयावीत. |
| **नवीन फळबाग** | **लागवड** | • लागवडीसाठी पूर्वतयारी केलेल्या जागेवर आंबा, काजू, चिकू फळझाडांची नवीन रोपांची लागवड करावी. पिशवीतील कलम मातीच्या हुंडीसह माती शेणखत आणि सिंगल सुपर फोस्फेटच्या मिश्रणाने भरलेल्या खड्ड्याच्या मध्यभागी ठेवून कलम लावावे. लागवड करतेवेळी कलमाचा जोड जमिनीच्या थोडा वर राहील याची काळजी घ्यावी. वाळवी पासून त्रास होवू नये म्हणून लागवडीच्या वेळी खड्ड्यामध्ये १०० ग्रॅम १.५ टक्के क्लोरपायरीफॉसची पावडर टाकावी. लागवडीनंतर कलमांना काठीचा आधार दयावा. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही) |
| **वांगी** | **पुर्नलागवड** | • वांगी पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मि. ली. प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ८ टन शेणखत, ४३ किलो युरिया, १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्रा दयावी. |
| **मिरची** | **पुर्नलागवड** | • मिरची पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मि. ली. प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ८ टन शेणखत, ८६ किलो युरिया, १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्रा |

| | | |
|---|---|---|
| | | द्यावी. |
| **भेंडी** | **लागवड** | • भेंडी पिकाची लागवड करावी. लागवड सरी पद्धतीने ६० x ६० सें.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस १५ टन शेणखत, ७२ किलो युरिया, ३१३ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ८३ किलो म्युरेट ऑफ पोटाश प्रती हेक्टरी खताची मात्रा द्यावी. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**